# मेस्कोतील कंत्राटी लिपिक अर्जासाठी ११ पर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे अंतर्गत मेस्को क्षेत्रीय कार्यालय नाशिक येथे एक लिपिक पद रिक्त आहे. या पदासाठी माजी सैनिकांनी (लिपिक) ११ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नाशिक लेफ्टनंट कमांडर ओंकार कापले (निवृत्त) यांनी केले आहे. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार असल्याने अनुभवींनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लिपिक पदासाठी लेखी परीक्षा, मुलाखत आणि संगणक चाचणी १५ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता मेस्को क्षेत्रीय कार्यालय, नाशिक येथे होणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कापले यांनी कळविले आहे.

# कंत्राटी लिपिक अर्जाकरिता ११ सप्टेंबरची मुदत

नाशिक : महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे अंतर्गत नाशिक येथील मेस्को क्षेत्रीय कार्यालयात एक लिपिक पद रिक्त आहे. या पदासाठी माजी सैनिकांनी (लिपिक) दि. ११ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिककल्याण अधिकारी लेफ्टनंट कमांडर ओमकार कापले (निवृत्त) यांनी केले आहे. लिपिक पदासाठी लेखी परीक्षा, मुलाखत आणि संगणक चाचणी दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ला मेस्को क्षेत्रीय कार्यालय, नाशिक येथे होणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२५३-४०१५३६४ तसेच ९४२०६९७८११ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असेही कापले यांनी कळविले आहे.